# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 07.09.2010 रोजी (का.प.क्रं.07) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त**

मंगळवार दिनांक 07 सप्टेंबर 2010 रोजी मा.सभापती श्री.राजू रामराव शिंदे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दुपारी 04.00 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त, डॉ.पुरूषोत्तम भापकर,भा.प्र.से., नगरसचिव श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री.सुर्यकांत सुभानराव जायभाये
02. स. श्री.विजय लक्ष्मणराव वाघचौरे
03. स. श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
04. स. श्री.खान आगा मीयॉ खान
05. स. श्री.विकास रतनलाल जैन
06. स. श्री.रेणुकादास (राजू) दत्तोपंत वैद्य
07. स. श्री.महेश शिवाजीराव माळवतकर
08. स. सौ.साधना गणेश सुरडकर
09. स. श्री.अमित सुधाकर भुईगळ
10. स. श्री.नासेरखॉन अब्दुल रहेमानखान
11. स. श्री.अब्दुल साजेद अ.सत्तार
12. स. श्री.मधुकर दामोधर सांवत
13. स. श्री.जुबेर गाझी असीर अहमद
14. स. श्री.प्रल्हाद गणपतराव निमंगावकर

**विषय क्र. 46 :** (दि.30-8-2010 रोजीच्या सभेतील स्थगित करण्यात आलेला विषय क्र. 43)

मा.आयुक्त यांच्या मान्यतेने प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अग्निशमन विभाग, महानगरपालिका औरंगाबाद यांना औरंगाबाद शहर व जिल्ह्यासाठी तसेच विभागीय आपत्कालीन केंद्रातंर्गत औरंगाबाद, जालना, बीड जिल्ह्यासाठी आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 तसेच विभागीय आपत्ती व्यवस्थापन केंद्र स्थापन केल्याचा शासन निर्णय 2006/क्र.डी.एम.यु. 2006/सीआर-11/ डी.एम-1 दि. 25/07/2006 नुसार सेवा पुरवावी लागणार आहे तसेच महाराष्ट्र आग प्रतिबंधक जीव संरक्षण कायदा 2006 ची अंमलबजावणी दिनांक 06/12/2008 नुसार औरंगाबाद शहराची लोकसंख्या व क्षेत्रफळ पाहता आपत्कालीन परिस्थितीमध्ये सक्षमतेने व कार्यक्षमतेने कार्य करण्यासाठी एक मिनी फायर टेंडर खरेदी करावयाचे आहे.

औरंगाबाद शहर हे झपाट्याने वाढत असून शहरातील झोपडपट्टी व इतर छोट्या छोट्या गल्लीमध्ये लागलेली आग विझवण्यास अत्यंत अवघड जाते. तसेच व्ही.आय.पी. बंदोबस्ताच्या कन्व्हॉयमध्ये अग्निशमन विभागाचे वाहन इतर वाहनांच्या सोबत न जाता मागे पडतात व जास्त जोरात धावतांना तोल जाऊन अपघात होत आहेत. यासाठी वॉटर मीस्ट मिनी फायर टेंडर खरेदी करणे अत्यंत आवश्यकता आहे. सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.780 दि.21/12/2009 नुसार वॉटर मीस्ट मिनी फायर टेंडर खरेदी रूपये 40,06,100/- मान्यता मिळालेली असून यासाठी प्रशासकीय मान्यता दिनांक 05/08/2010 रोजी देण्यात आलेली आहे.

जाहीर निविदा राज्यस्तरीय वर्तमान पत्र दैनिक सामना मुंबई, दैनिक सकाळ पुणे, दैनिक लोकमत औरंगाबाद, दैनिक पुण्यनगरी औरंगाबाद तसेच ई-टेंडर मार्फत दर मागविण्यात आलेले आहेत. याबाबत दोन निविदा धारकाच्या निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यामुळे फेर जाहीर निविदा दि.07/07/2010 रोजी देण्यात आली. त्यानंतर दि.22/07/2010 रोजी निविदा उघडल्या असता तीन निविदा धारकाच्या निविदा प्राप्त झाल्या असून त्यापुढील प्रमाणे आहेत. 1) एमईएस इंजिनिअरींग 2) मुरली टेक्नो प्रा.लि. 3) अल्फा ॲटोबोडीज यांच्या निविदा आलेल्या आहेत. यामध्ये एमईएस इंजिनिअरींग, ठाणे यांचे सर्वात कमी दराची (रूपये 39,66,039/-) निविदा आहे.

मा.आयुक्त यांच्या दालनात बैठकीमधील चर्चेनुसार जाहीर निविदेतील आलेल्या दरास 1 टक्का दर कमी करून रूपये 39,26,378/- या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देऊन प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अग्निशमन विभागासाठी वॉटर मीस्ट मिनी फायर टेंडर खरेदी करणेकरीता सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.780 दि.21/12/2009 नुसार वॉटर मीस्ट मिनी फायर टेंडर खरेदीसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व रक्कम रू.39,26,378/- या दराचे निविदेस व वॉटर मीस्ट मिनी फायर टेंडर एमईएस इंजिनिअरींग, ठाणे यांचे मार्फत खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 47 :** (दि.30-8-2010 रोजीच्या सभेतील स्थगित करण्यात आलेला विषय क्र. 44)

मा.आयुक्त यांच्या मान्यतेने प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अग्निशमन विभाग, महानगरपालिका औरंगाबाद यांना औरंगाबाद शहर व जिल्ह्यासाठी तसेच विभागीय आपत्कालीन केंद्रातंर्गत औरंगाबाद, जालना, बीड जिल्ह्यासाठी आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 तसेच विभागीय आपत्ती व्यवस्थापन केंद्र स्थापन केल्याचा शासन निर्णय 2006/क्र.डी.एम.यु. 2006/सीआर-11/ डी.एम-1 दि. 25/07/2006 नुसार सेवा पुरवावी लागणार आहे तसेच महाराष्ट्र आग प्रतिबंधक जीव संरक्षण कायदा 2006 ची अंमलबजावणी दिनांक 06/12/2008 नुसार औरंगाबाद शहराची लोकसंख्या व क्षेत्रफळ पाहता आपत्कालीन परिस्थितीमध्ये सक्षमतेने व कार्यक्षमतेने कार्य करण्यासाठी महानगरपालिका औरंगाबाद तर्फे पुरवठा करण्यात आलेल्या तीन टाटा 1613 एल.पी.टी. चेसीसवर फायर टेंडर फॅब्रीकेट करणे व त्याबरोबर लागणाऱ्या सर्व ॲक्सेसरीज व इक्वीपमेंट बसविणे व चाचणी करून देणेसाठी प्रस्तावित आहे.

अग्निशमन विभाग, महानगरपालिका औरंगाबादसाठी फायर टेंडरचे चेसेस (चार नग) टाटा एल.पी.टी.1613/42 सी.एम.व्ही.आर. कॉन-ईरो-2 चेसेस खरेदी केलेले आहेत. सदरील खरेदी ही 12 वा वित्त आयोगाच्या अनुदानातून खरेदी केलेली आहे. यासाठी सर्वसाधारण सभेने ठराव क्र. 418 दिनांक 12/02/2009 अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. विभागाने चार चेसेस खरेदी केलेले असून त्यापैकी तीन चेसेसवर फायर टेंडर फॅब्रिकेशन करावयाचे आहेत.

जाहीर निविदा सूचना राज्य/राष्ट्रीय स्तरावरील वर्तमानपत्र दैनिक टाईम्स ऑफ इंडिया,नवी दिल्ली, दैनिक लोकसत्ता, मुंबई, दैनिक महाराष्ट्र टाईम्स, मुंबई, दैनिक सामना, मुंबई, दैनिक सकाळ पुणे, दैनिक लोकमत औरंगाबाद तसेच ई-टेंडर मार्फत दर मागविण्यात आलेले आहेत. याबाबत तीन निविदा धारकाच्या निविदा प्राप्त झाल्या असून त्यापुढील प्रमाणे आहेत. 1) ब्रिजवासी हायटेक उद्योग 2) श्रीटेकॉन, हैद्राबाद 3) देवीफायर सर्व्हीसेस यांच्या निविदा आलेले आहेत. यामध्ये श्रीटेकॉन, हैद्राबाद यांचे दर सर्वात कमी आहेत. त्यांचे दर रूपये (99,97,325.00 + 12,49,665 Vat) = 1,12,46,990/- हे आहेत.

मा.आयुक्त यांच्या दालनातील बैठकीमधील चर्चेनुसार जाहीर निविदेतील आलेल्या दरास 1 टक्के दर कमी करून रूपये 1,11,34,520/- या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देऊन प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अग्निशमन विभागासाठी सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र. 418 दिनांक 12/02/2009 नुसार खरेदी करण्यात आलेल्या तीन टाटा 1613 एल.पी.टी. चेसीसवर फायर टेंडर फॅब्रीकेट करणे व त्याबरोबर लागणाऱ्या सर्व ॲक्सेसरीज व इक्वीपमेंट बसविणे व चाचणी करून देणेसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व र.रू.1,11,34,520/- या दराचे निविदेस व तीन टाटा 1613 एल.पी.टी. चेसीसवर फायर टेंडर फॅब्रीकेट करणे व त्याबरोबर लागणाऱ्या सर्व ॲक्सेसरीज व इक्वीपमेंट बसविणे व चाचणी करून घेणे हे काम श्रीटेकॉन, हैद्राबाद यांच्याकडून करून घेणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 48 :**

कार्यकारी अभियंता, वार्ड इ व फ महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, पिरबाजार ते एकता चौक (शहानुरवाडी) रस्त्यावरील उस्मानपुरा पोलिस स्टेशन नाल्यावर बॉक्स कल्व्हर्ट बांधणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.44,59,650/- च्या अंदाजपत्रकास ठराव क्र.857 दिनांक 21.12.2009 (बाराव्या वित्त आयोगा अंतर्गत) अन्वये मा.सर्वसाधारण सभेची मंजुरी प्राप्त झाली असून सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण दोन निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत सदरील दोन निविदा दर भरून प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1 | श्री.शेख मोहम्मद इब्राहिम | 4.8 % कमी दर |
| 2 | श्री.एल.के.कन्स्ट्रक्शन | 12.78 % जास्त दर |

वरिल प्राप्त निविदापत्रकापैकी श्री.शेख मोहम्मद इब्राहिम यांचे निविदांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.8 % कमी असे आहेत.

तरी श्री.शेख मोहम्मद इब्राहिम यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.8 % कमी दराचे निविदापत्रक मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पिरबाजार ते एकता चौक (शहानुरवाडी) रस्त्यावरील उस्मानपुरा पोलिस स्टेशन नाल्यावर बॉक्स कल्व्हर्ट बांधणे या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.8 % कमी दराची श्री.शेख मोहम्मद इब्राहिम यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. 49 :**

कार्यकारी अभियंता ब/क प्रस्ताव सादर करीत आहेत की, वार्ड क्र.24 नारेगांव येथील विविध गल्ल्यामधील ड्रेनेज लाईन बदलून नविन मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाचे अं.पत्रक रू.11,60,000/- चे तयार करण्यांत आले असून त्यास स्थायी समिती सभा विषय क्र.35 दिनांक 30/08/2010 अन्वये मंजुरी मिळालेली आहे. या कामाचा खर्च सन 2010-2011 या आर्थिक वर्षात

देखभाल दुरूस्ती व जलनिसःरण या लेखाशिर्षकामधून करण्यांत येईल. त्या अन्वये सदर कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण 5 निविदा प्राप्त झाल्या असून दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| 01. | श्री.अजय गणेशराव थोटे | 16.72 % कमी दराने |
| 02. | श्री.अब्दुल हासीब | 16.00 % कमी दराने |
| 03. | श्री.व्ही.एस.देशमुख | 07.00 % कमी दराने |
| 04. | मे.कासलीवाल कन्स्ट्रक्शन | 05.78 % कमी दराने |
| 05. | मे.एल.के.कन्स्ट्रक्शन | 04.99 % जास्त दराने |

तरी सदरील कामासाठी श्री.अजय गणेशराव थोटे यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 16.72 % कमी दराच्या निविदेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती : ऐनवेळचे विषय मंजूर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.24 नारेगांव येथील विविध गल्ल्यामधील ड्रेनेज लाईन बदलून नविन मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 16.72 % कमी दराची श्री.अजय गणेशराव थोटे यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 50 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येत आहे की, दि.19/06/2010 रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेत सन 2010-2011 या वर्षाकरीता मनपा शालेय विद्यार्थ्यांना पांढरे पायमोजे आणि नेकटाय हे साहित्य देण्याकरीता आवश्यक कार्यवाहीस व आर्थिक तरतूदीस मान्यता प्रदान केली आहे.

त्यानुसार पांढरे पायमोजे आणि नेकटाय खरेदीसाठी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यांत आली होती. दि.3/7/2010 ते दि.9/7/2010 पर्यंत निविदा विक्री ठेवण्यात आली होती. दि.9/7/2010 रोजी निविदा स्विकारण्यात आल्या. एकूण 3 निविदा प्राप्त झाल्या असून निविदाधारक पुढीलप्रमाणे आहे.
1) मे.अभय ट्रेडर्स, 2) मे.क्रिश इंटरनॅशनल, 3) मे.एम.आर.व्ही. इंटरप्रायजेस, या निविदाधारकांनी निविदेसोबत दिलेले नमुने शासनमान्य प्रयोगशाळेत तपासणीकरीता पाठविण्यात आले होते. सदर संस्थेचा तपासणी अहवाल दि.13/8/2010 रोजी प्राप्त झालेला आहे. सर्व निविदाधारकांचे व्यापारी लिफाफे उघडण्यात आले. प्राप्त दरात मे.एम.आर.व्ही. इंटरप्रायजेस यांचे दर न्युनतम आहेत.

वाटाघाटीअंती प्राप्त दरात 5% कमी करून साहित्य पुरवठा करण्याकरीता संबंधीत एजन्सीने संमती दिली आहे. केंद्रीय खरेदी समितीच्या दि.3/9/2010 रोजी झालेल्या बैठकीमध्ये सदर साहित्य खरेदीस समितीने शिफारस केली आहे. शिक्षण विभागाकडून खरेदी संख्या मागविण्यात आली असून यामध्ये मागील वर्षाचा शिल्लक साठा विचारात घेण्यात आला आहे. त्यानुसार साहित्य खरेदीकरीता रू.13,46,466/- एवढा खर्च अपेक्षित आहे. शिक्षण विभागास अतिरिक्त साहित्य लागल्यास त्यांच्या लेखी मागणीनुसार मान्य दरानुसार खरेदी करून देण्यांत येईल.

करिता प्राप्त कमी दराच्या स्विकृतीसह साहित्य खरेदीच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन 2010-2011 या वर्षाकरीता मनपा शालेय विद्यार्थ्यांना पांढरे पायमोजे आणि नेकटाय हे साहित्य देण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.एम.आर.व्ही. इंटरप्रायजेस यांचेशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार प्राप्त दरात 5% कमी करून साहित्य खरेदी करण्यास व त्यासाठी लागणाऱ्या खर्चासह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 51 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येत आहे की, दि.19/6/2010 रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेत सन 2010-2011 या वर्षाकरीता मनपा शालेय विद्यार्थ्यांना रेक्झिन व कॅनवॉस शुज देण्याकरीता आवश्यक कार्यवाहीस व आर्थिक तरतूदीस मान्यता दिली आहे.

त्यानुसार रेक्झिन व कॅनवॉस शुजकरीता वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. दि.3/7/2010 ते दि.9/7/2010 पर्यंत निविदा विक्री ठेवण्यात आली होती. दि.9/7/2010 रोजी निविदा स्विकारण्यात आल्या. एकूण 03 निविदा प्राप्त झाल्या असून निविदाधारक पुढीलप्रमाणे आहे.
1) मे.क्रिश इंटरनॅशनल, 2) मे.अभय ट्रेडर्स, 3) मे.टेक्नोट्रेड इम्पेक्स इंडिया प्रा.लि. या निविदाधारकांनी निविदेसोबत दिलेले नमुने शासनमान्य प्रयोगशाळेत तपासणीकरीता पाठविण्यात आले होते. सदर संस्थेचा तपासणी अहवाल दि.13/8/2010 रोजी प्राप्त झालेला आहे. त्यानंतर निविदाधारकांचा व्यापारी लिफाफा उघडण्यात आला. प्राप्त दरांच्या तुलनात्मक तक्त्यानुसार मे.क्रिश इंटरनॅशनल यांचे दर न्युनतम आहेत.

वाटाघाटीअंती प्राप्त दरात 10% कमी करून साहित्य पुरवठा करण्याकरीता संबंधीत एजन्सीने संमती दिली आहे. केंद्रीय खरेदी समितीच्या दि.3/9/2010 रोजी झालेल्या बैठकीमध्ये सदर साहित्य खरेदीस समितीने शिफारस केली आहे. शिक्षण विभागाकडून खरेदी संख्या मागविण्यात आली असून यामध्ये मागील वर्षाचा शिल्लक साठा विचारात घेण्यात आला आहे. त्यानुसार साहित्य खरेदीकरीता रू.61,16,643/- एवढा खर्च अपेक्षित आहे. शिक्षण विभागास अतिरिक्त साहित्य लागल्यास त्यांच्या लेखी मागणीनुसार मान्य दरानुसार खरेदी करून देण्यांत येईल.

करिता प्राप्त कमी दराच्या स्विकृतीसह साहित्य खरेदीच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन 2010-2011 या वर्षाकरीता मनपा शालेय विद्यार्थ्यांना रेक्झिन व कॅनवॉस शुज देण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.क्रिश इंटरनॅशनल यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार प्राप्त दरात 10 % कमी करून साहित्य खरेदी करण्यास व त्यासाठी लागणाऱ्या खर्चासह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 52 :**

कार्यकारी अभियंता, वार्ड ब व क, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेअंतर्गत फारोळा जलशुध्दीकरण केंद्र येथे जलशुध्दीकरण प्रक्रियेत निर्जंतुकीकरणासाठी आवश्यक असलेल्या क्लोरीनचा वार्षीक पुरवठा करण्यासाठी रु. 25,82,000/- चे अंदाजपत्रक सादर केले होते. त्यास मा.आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार मा.सर्वसाधारण सभेने दिनांक 17.07.2010 रोजी मान्यता प्रदान केली आहे.

क्लोरीनचा पुरवठा करण्यासंबधी ई - निविदा विभागा मार्फत निविदा प्रक्रिया करण्यात आली. निविदे प्रक्रिये अंतर्गत एकुण चार निविदा विक्री झाल्या व शेवटच्या प्राप्तीच्या दिवशी दर भरलेल्या तीन निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

1. मे. मधुमय उद्योग मुंबई

| | | |
|---|---|---|
| अ. 900 किलो ग्रॅम टनर | - | रुपये 15,500/- प्रति मे टन |
| ब. 100 किलो ग्रॅम सिलेंडर | - | रुपये 50,000/- प्रति मे टन |
| क. हायड्रोलिक चाचणी | - | रुपये 8,000/- प्रति नग |

2. मे. रंग रसायन पुणे

| | | |
|---|---|---|
| अ. 900 किलो ग्रॅम टनर | - | रुपये 15,500/- प्रति मे टन |
| ब. 100 किलो ग्रॅम सिलेंडर | - | रुपये 50,000/- प्रति मे टन |
| क. हायड्रोलिक चाचणी | - | रुपये 8,000/- प्रति नग |

3. मे. आयडीयल केमीकल्स मुंबई

| | | |
|---|---|---|
| अ. 900 किलो ग्रॅम टनर | - | रुपये 16,000/- प्रति मे टन |
| ब. 100 किलो ग्रॅम सिलेंडर | - | रुपये 55,000/- प्रति मे टन |
| क. हायड्रोलिक चाचणी | - | रुपये 8,500/- प्रति नग |

प्राप्त दरांपैकी मे. मधुमय उद्योग व मे. रंग रसायन पुणे यांचे दर सारखे असल्याने त्यांना चर्चेसाठी बोलावले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर कमी केले.

| | | |
|---|---|---|
| अ. 900 किलो ग्रॅम टनर | - | रुपये 15,400/- प्रति मे टन |
| ब. 100 किलो ग्रॅम सिलेंडर | - | रुपये 49,950/- प्रति मे टन |

उपरोक्त विवरणानुसार दोन्हीही यंत्रणांनी 900 कि.ग्रॅम सिलेंडर च्या दरामध्ये 100 रुपये प्रति मे. टन व 100 कि.ग्रॅम सिलेंडर च्या दरामध्ये 50 रुपये प्रति मे. टन याप्रमाणे दर कमी केलेले आहेत. यानुसार क्लोरीन पुरवठया करीता खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| | | |
|---|---|---|
| अ. 900 कि. ग्रॅम टनर | 196 मे.टन x रु. 15400 | = रु. 30,18,400/- |
| ब. 100 कि. ग्रॅम सिलेंडर | 2.40 मे.टन x रु. 49500 | = रु. 1,18,800/- |
| क. हायड्रोलीक चाचणी | 22 नग x रु. 8000 | = रु. 1,76,000/- |
| | | **एकुण = रु. 33,13,200/-** |

तुलनात्मक दृष्टया प्राप्त दर हे,

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रकीय किंमती पेक्षा | - | 28.33 % जास्त आहेत. |
| दरसुचि सन 2009-10च्या किंमती पेक्षा | - | 18.36 % जास्त आहेत. |
| मागील वर्षीच्या मंजुर दरानुसार येणाऱ्या किंमती पेक्षा | - | 73.11 % जास्त आहेत. |

सदरील पुरवठयासाठी सन 2010-11 च्या प्रस्तावीत अर्थसंकल्पामध्ये रसायन सामुग्री खरेदी या लेखाशिर्षका अंतर्गत तरतुद ठेवण्यात आलेली आहे.

मा. आयुक्त यांनी सदरच्या दराने व सारखे दर आलेल्या मे. रंग रसायन पुणे व मे. मधुमय उद्योग मुंबई यांना प्रत्येकी 50% या प्रमाणे पुरवठा करण्यास मान्यता प्रदान केलेली आहे. तसेच प्रस्ताव मा.स्थायी समिती सभे समोर सादर करण्यासाठी शिफारस केली आहे.

करीता फारोळा जलशुध्दीकरण केंद्र येथे वार्षीक क्लोरीन पुरवठा करणे या कामासाठी मे. रंग रसायन पुणे व मधुमय उद्योग मुंबई यांना प्रत्येकी 50% पुरवठा करण्यासाठीची निविदा.

| | | |
|---|---|---|
| अ. 900 किलो ग्रॅम टनर | - | रुपये 15,400/- प्रति मे टन |
| ब. 100 किलो ग्रॅम सिलेंडर | - | रुपये 49,950/- प्रति मे टन |
| क. हायड्रोलिक चाचणी | - | रुपये 8,000/- प्रति नग |

या दराने खरेदी करावयाचा प्रस्ताव तसेच एकुण रक्कम रुपये 33,13,200/- च्या खर्चाचा प्रस्ताव मा. स्थायी समिती सभे समोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पाणी पुरवठा योजनेअंतर्गत फारोळा जलशुध्दीकरण केंद्र येथे जलशुध्दीकरण प्रक्रियेत निर्जतुकीकरणासाठी आवश्यक असलेल्या क्लोरीनचा वार्षीक पुरवठा करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी सारखे दर आलेल्या मे. रंग रसायन पुणे व मे. मधुमय उद्योग मुंबई यांचेकडून प्रत्येकी 50% या प्रमाणे खरेदी करण्यास व त्यासाठी लागणाऱ्या खर्चासह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री.अ.साजेद अ.सत्तार:मा.सभापती यांची परवानगी घेउन माहीती सादर करतो. मनपाच्या जागेवर इमारत उभी राहीली आहे त्याबाबतीतची माहितीची प्रत सर्व स.सदस्यांना देण्यात यावे.

(सर्व स.सदस्य आणि अधिकारी यांना प्रत देण्यात येते)

मा.सभापती :सदरील विषयासंबधी वेगळी विशेष बैठक आयोजित करू.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :सदरील विषयाच्या चर्चेकरीता 20 मिनीटांचा अवधी लागेल. विशेष सभेची गरज नाही. माझी विनंती आहे की, मनपाच्या जे जास्त हुशार टेक्नीकल अधिकाऱ्यास काही प्रश्नांची विचारणा करायची आहे. आपण ठरवावे कोणास प्रश्न विचारावे. ते टेक्नीकल पाहीजे. ADTP श्री.कुलकर्णी साहेब यांना 2-3 प्रश्न विचारायचे आहे. मा.सभापती यांच्या परवानगीने चर्चा करण्यात येते. आजच्या सभेत श्री.झनझन साहेबांनी खूलासा केला होता. ते अतिक्रमण बद्दल मा.आयुक्त आणि मा.सभापती यांचे सर्वप्रथम अभिनंदन करतो. आपण इमारत निरीक्षक श्री.शेख यांना निलंबीत केले तसे मी निवेदन दिलेले आहे.

मागील बैठकीत प्रशासकीय अधिकारी यांनी सभागृहात खोटी माहिती दिली होती की, ही जमीन खाजगी जमीन आहे. या सभागृहाला खोटी माहीती देणे काही नविन नाही. प्रशासकीय अधिकारी यांनी लोकशाही दिनामध्ये लिखीत स्वरूपात विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मनपा आयुक्त, मा.सभापती यांना खोटी माहिती दिलेली आहे. सिटी सर्वे नंबर 11136 ही एकुण जमीन किती आहे, सभागृहास खुलासा करण्यात यावा. शासकीय नगर भुमापन अधिकारी यांचे दोन डॉक्युमेंट आहे. दोन वेगवेगळे आहे. त्या बाबतीत प्रश्न विचारणा करीत आहे. पी.आर कार्डवर किती क्षेत्राची नोंद झालेली आहे. याचा खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :सदरील निवेदनाचा अभ्यास करावा लागेल. खुलासा करण्यात यावा.

ADTP :स.सदस्यांनी विचारणा केलेल्या प्रश्नानुसार नगर भूमापन क्रमांक 11136 यांचे क्षेत्र पी.आर.कार्ड प्रमाणे क्षेत्र 96.9 चौ.मिटर आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :पी.आर.कार्डवर एकुण 96.9 चौ.मी आहे. पुन्हा प्रश्न आहे. पी.आर.कार्डवर एकूण किती क्षेत्राची नोंद झालेली आहे. आणखी सहाय्यक लागेल तर देण्यात यावे. महसुल कायद्या नुसार.

मा.सभापती :किती क्षेत्र आहे.

ADTP : 96.9 चौ.मि.आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :96.9 चौ.मी.क्षेत्रांची नोंद आहे. एकुण क्षेत्र किती नोंद करण्यात आली. पी आर कार्डवर आपण बांधकाम परवानगी देतो. त्यात प्रत्येक व्यक्तीचे किती क्षेत्र आहे त्याची नोंद असते. एकूण किती नोंदी आहेत. पी.आर.कार्डवर हा प्रश्न आहे.

ADTP : 20 बाय 17 फुट कमी केलेले आहे. 30 बाय 40 त्याच्यातुन कमी केलेले आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :एकुण क्षेत्र कितीची नोंद आहे. पि.आर कार्डवर 96.9चौ.मी. नोंद आहे. पि.आर कार्डवर किती क्षेत्रांची नोंद आहे हा माझा प्रश्न आहे. 25 किलोचा गठ्ठा मी माझ्या डोक्यावर आणला आहे. बैठकीच्या 36 तासापुर्वी माझे निवेदन दिलेले आहे. 36 तास एक पि.आर.कार्डचा अभ्यास करण्यास बराच वेळ आहे.

मा.सभापती :वेळ लागत असेल तर आपणाला वेळ देण्यात येईल.

ADTP :112.77 येईल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :चुकीची माहिती देण्यात येवु नये. बेरीज येत नसेल तर सांगून द्या. खोटी माहीती देवू नका. यापुर्वी लिखीत स्वरुपात झनझन साहेबांनी खोटी माहिती दिलेली आहे. श्री.झनझन साहेब यांचे म्हणण्याप्रमाणे आजपर्यंत बांधकाम रोखण्यात आलेले नाही सरकारी खुली जागेवर चार मजली इमारत उभी आहे आणि सभागृहात

सांगीतले जाते की, खाजगी जागा आहे. ती जागा महानगरपालिकेची आहे. श्री.खांडेकर उपआयुक्त हे सिटी सर्वे ऑफिसमध्ये जाऊन आलेले आहे त्यांना विचारणा करण्यात यावी की, जमीन खाजगी आहे की, सरकारी आहे. तेंव्हापर्यंत ADTP साहेब Calculation करतील.

ADTP :64.32 स्के.मी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :खोटी माहिती देत आहे. मी कोणाच्या विरोधात नाही. श्री.विकास जैन हे सभागृहात नाही. त्यांना बोलले म्हणून अधिकाऱ्यांना बाहेर काढले. श्री.झनझन साहेबांनी लिखीत स्वरूपात मा.विभागीय आयुक्त, मा.जिल्हाधिकारी, मा.मनपा आयुक्त, मा.सभापती यांना खोटी माहिती दिलेली आहे. त्यांना सभागृहाबाहेर काढा. सर्व सदस्यांना एकच न्याय द्यावा लागेल. त्या दिवशी अधिकारी यांचा वाद तोंडी स्वरूपात होता मी लिखीत स्वरूपात दाखविणार सर्व सदस्यांना एकच न्याय द्यावा लागेल विभागीय आयुक्त, मा.महापालिका आयुक्त, जिल्हा लोकशाही दिवसाचे जिल्हाधिकारी आणि या सभागृहास एका महानगरपालिका जागेचा अधिकारी खोटा खुलासा करतात ही खाजगी मालकीची जागा आहे . अगोदर सभागृहातून तरी बाहेर काढा. एकाला एक एकाला एक करता येणार नाही. तोंडी स्वरूपात होते. आम्ही आपण सोबत होतो. लिखित स्वरूपात आहे. पेज नंबर FB-70 दिनांक 21.08.2009 रोजी श्री.झनझन साहेब म्हणतात,परवानगी इत्यादी कागदपत्राबाबत विचारणा केली असता संबधीताने जागेवर नगर भूमापन क्रमांक 11136 हे खरेदीखत व न्यायालयीन कागदपत्रे सादर केली असल्याने सदरील जागा सरकारी किंवा रस्त्यापैकी नसुन खाजगी जागेवर अनाधिकृत बांधकाम करण्यात आलेले आहे. सदरील जागेच्या नकाशावर 11136 च्या पी.आर.कार्डवर मनपाची खुली जागा अथवा खुली जागा लिहीलेली आहे का?

ADTP :नकाशावर नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :नकाशावर आहे खुली जागा.

ADTP :11136

श्री.अ.साजेद अ.सत्तार :11136चे calculation आपणांस आयुष्यभर येणार नाही. कारण त्यास शिकावे लागते. त्यांनी जर दोन वेळा सभागृहास खुलासा केला आहे की, एवढे क्षेत्र आहे. एवढे क्षेत्र निघालेतर मी माझ्या पदाचा मा.अयुक्तांना राजीनामा देईल. खोटी माहीती केंव्हापर्यंत सभागृहाला देणार. मा.विधी सल्लागार यांचेकडुन खुलासा घेण्यात यावा की, एखादया नगरसेवकाने जिथे अतिक्रमणचे काम चालु आहे. त्या ठिकाणी स.नगरसेवक हजर झाल्यास नियमानुसार त्या नगरसेवकाचे सदस्यपद रद्द करता येते का खुलासा घेण्यात यावा. महासभेत 3 नगरसेवक एवढी एवढी उंचीचे एकच हाईट एकच मतदारसंघ, एकच उद्देश, स्टीलमे टाटा, आदमीमें नाटा, चप्पल में बाटा, मा.आयुक्तांची दिशाभूल करित आहे की, सदरील इमारत 15 वर्षापुर्वी बांधलेली आहे. सदरील इमारत ही ऑक्टोबर 2009 मध्ये बांधलेली आहे. या प्रकरणात संबधीत इमारत निरीक्षक यांना निलंबीत केलेले आहे. ज्या सदस्यांनी महासभेची, स्थायी समितीची आणि मा.आयुक्तांची दिशाभुल केलेली आहे. हा सरकारी रस्ता येथे लिहलेले आहे. मा. ADTP साहेब काय खुलासा करतात. मी लिखीत स्वरूपात मा.झनझन साहेबांचे पत्र दिलेले आहे. जे सदस्यांनी महासभांची स्थायी समितीची, मा.आयुक्तांची दिशाभूल केली. जर मा.आयुक्तांनी त्यांचेवर

त्यांचे सदस्य रद्द केले नाहीतर मी सी व्ही सी कडे जाणार, मा.उच्च न्यायालयात जाऊन त्यांचे निलंबन करणार आहे. मा.उच्च न्यायालयाचे माझे कागदपत्रेपण आहेत. अतिक्रमण चालू तेथे एखादे सदस्यांचे फोटो आलेतर सदस्य जाते. प्रशासकीय अधिकारी यांचेकडून केव्हा FIR दाखल केलेला आहे. खुलासा घेण्यात यावा. मा.आयुक्तांनी मा.सर्वसाधारण सभा स्थायी समितीला दिलेल्या आश्वासनाची पुर्तता करण्यासाठी इमारत निरीक्षक त्या ठिकाणी जाऊन 200 जनांचा जमाव गोळा करून मा.आयुक्त,सभापती आणि महानगरपालिकेला शिवीगाळ करतात. महासभेमध्ये 15 वर्षापुर्वीची इमारत असल्याची खोटी माहिती दिली जाते. तीन पंचनामे केलेले आहे. आक्टोबर 2009 मध्ये गुन्हा दाखल केला आहे. मा.ADTP साहेबांना एक प्रश्न विचारतो पी.आर.कार्डमध्ये दिनांक 12.03.2010ची एक नोंद केलेली आहे. नोंदणीकृत घोषणापत्र क्रमांक 1451 दिनांक 23.03.2009 अन्वये मिळकत नगरभुमापन क्रमांक 11136 चे धारक सय्यद हबीबउद्दीन सय्यद बुऱ्हानउद्दीन यांनी मिळकत विकासीत करून मोसीन टॉवर या नावाने घोषणापत्र दाखल केले. एखादा व्यक्ती अतिक्रमण करतो तसे चार प्रकारे अनिधिकृत कामे असतात.1. बिल्डर परवानगी घेतो खाजगी व्यक्ती परवानगी घेतो व परवानगी व्यतिरिक्त बांधतो. 2. अनधिकृत आहे 20X30 हे फार डेंजर आहे. 3. महाराष्ट्र शासन व केंद्र शासनाची मिळकत त्यास कस्टोडीअन प्रापर्टी म्हणतात. त्यास सत्ता प्रकार इ.दिलेला असतो. म्हणजे शासकीय जमीन सत्ता प्रकार फ म्हणजे वक्फबोर्ड त्यावर अतिक्रमण करणे गंभीर बाब आहे आणि महानगरपालिकेच्या खुल्या जागेवर अतिक्रमण. संबधीताने 350 स्के.फुट जमीनीवर 3100 चौ.फुटची जमीन बांधली आणि रजिष्ट्रर घोषणापत्र केले. आता काय चौकशी करणार. रजिष्ट्री ऑफिसमध्ये जाऊन 3100 स्के.फुट मनपाच्या जागेवर चारमजली इमारत बांधलेली आहे तिथे घोषणापत्र करून नोंद करतात व पी.आर.कार्डवर त्याची नोंद आहे. मनपाच्या रस्त्यावरील 300 स्के.फुटजागेवर 2100 स्के.फुट बांधकाम केलेले आहे. बांधकाम नियमीत करण्याचे अधिकार मा.आयुक्तांना, मा.उच्च न्यायालय, मुख्यमंत्री, यांना आहे. कदाचित प्रेसिंडेंड ऑफ इंडिया यांना असेल. परंतु 350 स्के.फुटची 2100 स्के.फुट जागा रेग्युलाईज करण्याचा अधिकार भारतात कुणालाही नाही. पुढच्या महिण्यात मा.ओबामा येत आहेत. त्यांना असेल तर माहित नाही. अधिकार असेल तर मा.ADTP किंवा मा.आयुक्तांनी खुलासा करावा. की,मनपाच्या 300 चौ.फुटावर 2100 चौ.फुट बांधकाम 4 मजली केले. घोषणापत्र पी.आर.कार्ड वाचावे. 31.03.2010ची नोंद आहे. त्यात घोषणापत्र रजिस्टर्ड करून ॲडमीट करतात. 300 स्के.फुट जागेवर 2100 चौ.फुट बांधकाम केले. सदरील क्षेत्रांचे एकुण मोजमाप संबधीत अधिकारी यांना करता येणार नाही तसेच पी.आर.कार्डचे Calculation कुणालाही करता येणार नाही. येत असेल तर सर्वांना संधी देण्यात येते. ADTP यांचेकडून खुलासा घेण्यात यावा की, घोषणापत्राचे किती क्षेत्र आहे. पी.आर.कार्डवर 29 स्के.मी.क्षेत्र आहे ग्राऊंड फ्लोअरवर 32 स्के.मी.केलेले आहे. सदरील इमारत ऑक्टोबर 2009 मध्ये पुर्ण झाली आणि संबधीत व्यक्ती फेब्रुवारी 2010 मध्ये त्या ठिकाणी राहण्यास गेले. मा.महासभा, मा.आयुक्तांची आणि मा.स्थायी समिती सभापतींची दिशाभुल करतात की, इमारत 15 वर्ष जुनी इमारत आहे. लोकशाही दिनात

लिखीत स्वरूपात खोटी माहिती दिलेली आहे की, खाजगी जागा आहे कारवाई करावी लागेल. महानगरपालिकेची नोंद त्यावेळी कोण करणार. 1968ची गोष्ट आहे. त्यावेळेस महानगरपालिका नव्हती. बलदिया होते. बलदिया खायापीया चलदिया. एकुण 8000 मालमत्ता आपल्या आहेत 300 मालमत्ता मनपाच्या नावांवर आहे. कोण करणार महानगरपालिकेचे अधिकारी महानगरपालिकेच्या खुली जागेला सभागृहात सांगतो खाजगी जमीन आहे. एक अधिकारी एक सदस्याला काहीतरी बोलतो त्याला बाहेर करता यांना का वेगळा न्याय अगोदर बाहेर करा नंतर निलंबित करा. माझे वाक्य लिहून घ्या मी मा.हायकोर्टात जाणार, मा.सभापती आपणासही व मा.आयुक्तांनाही पार्टी करणार प्रशासकीय अधिकारी व सर्वांना करणार. विधी विभागाकडुन खुलासा घेण्यात यावा की, एखादा नगरसेवक अतिक्रमणाच्या ठिकाणी गेल्यास त्याचे सदस्यत्व रद्द होते का.

श्री.नासेर खान :स.सदस्याचे व्यक्तव्य हे दादागीरीचे आहे. सन 1970 रोजी सिटी सर्वे ऑफिस आले होते. त्याचा कब्जा त्याचे जो पहिले मुळ मालक होते त्यांच्या नांवावर पी.आर.कार्ड.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :स.सदस्य श्री.नासेरखान यांना या प्रकरणाची माहिती नाही. ही मिळकत कधी खरेदी केली त्याचा प्रशासनाने खूलासा करावा. माझ्या प्रश्नावर दिशाभुल करू नये. मा.महासभा, मा.आयुक्त,मा.सभापती यांची दिशाभुल केली जात आहे. या बाबतीत काय आहे.

श्री.नासेर खान :स्थायी समितीचे दुसरे सदस्य आहेत त्या स.सदस्यांचे बोलणे वेगळे आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :हा कोणाचा प्रश्न नाही. हा दोन नगरसेवकांचा प्रश्न आहे. त्यांनी खोटी माहीती दिली का यांनी खोटी माहिती दिली. प्रश्न महानगरपालिकेचा आहे.

श्री.नासेर खान :यावर आजच्या आज मा.आयुक्त कार्यवाही करणार का. एवढे मोठे पुस्तक तयार करून आणलेले आहे त्यावर खुलासा कोण करणार वेळ लागेल. यासाठी एक वेगळी बैठक आयोजित करण्यात यावी. ADTP यांना वाचता आले नाही तर आम्हाला काय येणार.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :दोन कागदचे उत्तर देण्यात यावे. मला निवेदनाचे उत्तर कोणी देवू शकत नाही. मला माहीत आहे. दोन कागदांचे उत्तर द्यावे.

श्री.नासेर खान :मा.आयुक्त पुढील बैठक्ीत यासंबधीचे उत्तर देतील तोपर्यंत अधिकारी आणि स.सदस्य सदरचे निवेदनाचा अभ्यास करतील. त्यावेळी प्रशासनास आम्ही काही माहिती विचारू आम्हालाही अधिकार आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :माझ्या प्रश्नाचे उत्तर देण्यात यावे. माझ्या प्रश्नांचे उत्तर मा.सभापती साहेब आपण देणार आहात का. खुलासा करण्यात यावा. माझे दोन प्रश्नांचे उत्तर द्यावे मुलभूत हक्क आहे.

मा.सभापती :आपण जागेवर बसावे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :मला दोन कागदांचे उत्तर पाहीजे निर्णय पाहीजे.

श्री.नासेर खान :एकतर स.सदस्यांनी दिलेली माहिती खोटी आहे किंवा सभेमध्ये स.सदस्यांनी दिलेली माहिती खोटी आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :एकही कागद चुकीचा असेल तर माझ्या पदाचा राजीनामा देईल. या नकाशाचे नार्थ कोणते आहे ते तरी दाखवून द्यावे.

मा.सभापती :दिनांक 30.08.2010 रोजी हयाच विषयावर रूलिंग देण्यात आली होती की मा.आयुक्तांनी चौकशी करून कार्यवाही करावी. मा.आयुक्तांनी चौकशी केली किंवा नाही हा त्यांच्या प्रश्न आहे. निलंबनाची कार्यवाही केल्यानंतर हा प्रश्न सर्वसाधारण सभेत विचारण्यात आला. आपणही त्या सभागृहाचे सदस्य आहेत. आपण सर्वसाधारण सभेत हया मुद्दयावर चर्चा करायला हवी होती. आपण त्यावेळेस सही करून चालले गेले. हा विषय वरिल पातळीवर गेला आहे. सदरील विषयावर मा.आयुक्त आणि मा.महापौर निर्णय घेतील.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :मला बोलण्याचा अधिकार आहे.

मा.सभापती :संबधीत विषयावर रुलींग दिल्यावर कारवाई झाली. हया सभागृहाचा तो विषय संपलेला आहे. आपण कार्यवाही केली.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :महानगरपालिकेच्या जागेवर 2100 चौ.फुट इमारत उभी करतो. त्यावर काहीही कार्यवाही होत नाही.

मा.सभापती :याच विषयावरती आपण सांगीतल्याप्रमाणे रूलींग देण्यात आली आपण सांगितल्या प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आपण सांगितल्याप्रमाणे निलंबनाची कार्यवाही झाली. तोच विषय या सभागृहात आणण्याची काय आवश्यकता आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :माझे निवेदन वाचण्यात यावे मी मा.सभापती आणि मा.आयुक्त यांचे अभिनंदन केलेले आहे. मनपाचे हिता शिवाय दुसरा महत्वाचा विषय होऊ शकत नाही. मनपाच्या जागेवर एक माणूस 2100 चौ.फुट इमारत बांधली जाते आणि त्यास संरक्षण दिले जाते.

मा.सभापती :संबधीत कर्मचारी यांचेवर कारवाई करण्यात आलेली आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :लोकशाही दिनात खोटी माहिती दिलेली आहे.

मा.सभापती :आपण सांगीतल्यानुसार कार्यवाही झाली आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :सर्व जबाबदारांवर कार्यवाही करण्यात यावी. सदरील प्रश्न हा मनपाच्या जागेचा आहे. माझ्या स्वत:चा नाही.

मा.सभापती :मा.आयुक्त साहेबांनी खुलासा करावा आणि या संबधीची चौकशी करण्याकरीता उपआयुक्त (म) श्री.चारठाणकर यांना नियुक्त करण्यात यावे. त्यांनी सदरील इमारत केव्हा बांधलेली आहे याचा सविस्तर चौकशी करण्यात यावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :मनपाला मालकीचा अधिकार नाही. महानगरपालिका बांधकाम परवानगी पी.आर कार्डवर देण्यात येते. पी.आर कार्डवर नोंद झालेली आहे. त्यांनी 2000 चौ.फुट मनपाच्या जागेवर अतिक्रमण केलेले आहे आणि काय चौकशी करेल.

मा.सभापती :सदरील प्रकरणाबाबत उपआयुक्त (म) आणि स्थायी समितीचे दोन सदस्य चौकशी करतील संबधीत इमारतीवर जातील. तसेच मनपाचे इतर ठिकाणी महानगरपालिकेची जेथे-जेथे ओपन स्पेस आहेत. त्याबाबतची संपुर्ण चौकशी जसे सदरील जमीन कुणाच्या ताब्यात आहे. कोण मालक आहे. पी.आर कार्ड महानगरपालिकेच्या नांवावर आहे किंवा नाही. याची चौकशी करावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :सर्वात पहिले महानगरपालिकेचे हित आणि त्यानंतर सर्व गोष्टी आहे.

मा.सभापती :चौकशी समिती नेमुनच कार्यवाही होईल.सदरील इमारत प्रत्यक्ष जाऊन बघावी लागेल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :पी.आर.कार्डवर नोंद झालेली आहे.ओरिजनल पी.आर.कार्ड ADTP साहेबांकडे दिला आहे. मनपाच्या जागेवर 2000 फुटाची इमारत बांधकाम झालेली आहे काय चौकशी करणार कोण करणार.

मा.सभापती :मनपाची जागा आहे किंवा नाही याची चौकशी करावी लागणार आहे. सदरील विषय हा गंभीर असुन संबधीत अधिकारी यांनी सदरील प्रकरणाबाबत उपआयुक्त (म) आणि स्थायी समितीचे दोन सदस्य चौकशी करतील आणि संबधीतावर योग्य ती कार्यवाही करावी. दोन सदस्य श्री.साजेद आणि श्री.मधुकर सावंत आणि श्री.रेणुकादास वैद्य हे तीन स.सदस्य चौकशी समितीमध्ये राहतील.

याच बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती,स्थायी समिती यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| **नगर सचिव** | **सभापती,** स्थायी समिती |
| महानगरपालिका औरंगाबाद | महानगरपालिका औरंगाबाद |